I/0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** नौपाडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0324 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**31/10/2023 02:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 30/10/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/10/2023
**Time From (वेळेपासून):** 13:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/10/2023 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/10/2023 02:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
ईशान्य, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वस्तु व सेवा कर विभाग,चरई, ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दिपक जयवंत दुदुस्कर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रूम नं 01,साबेगांव ,तळमजला, अष्टविनायक अपार्टमेंट,दिवा पूर्व जिठाणे, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रूम नं 01,साबेगांव ,तळमजला, अष्टविनायक अपार्टमेंट,दिवा पूर्व जिठाणे, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7208423208

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक मधुकर सोमाजी ढोक | | वडील का नाम : सोमाजी ढोक | 1. 303,आमराई रोड, ,वैभव संकुल, विजय नगर,कल्याण, पुर्व ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 7,000/रुपये | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 31/10/2023

मी, दिपक जयवंत दुदुस्कर वय -25 वर्षं रा. रूम नं 01, तळमजला, अष्टविनायक अपार्टमेंट, साबेगांव, दिवा पूर्व, जि.ठाणे-400612 मो.नं-7208423208 समक्ष फिर्याद लिहुन देतो की,

मी, वरीलप्रमाणे असून, नमूद पत्त्यावर माझे कुंटूबियास राहणेस आहे. मी दिवापूर्व येथे शॉप प नं. 103, शिवम प्लाझा, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा या ठिकाणी दिपक टॅक्स कन्सल्टंट नावाचे ऑफीस मधून माझे जीएसटी टॅक्सबाबतचे तसेच जीएसटी संदर्भातील माझेकडे येणारे क्लायंटची जीएसटीची कामे संबधीत(जीएसटी)वस्तू व सेवाकर कार्यालय, ठाणे कार्यालयाची कामे करीत असतो.

माझे क्लायंट 'राखी ज्वेलर्स' चे प्रोप्रायटर, कुमावत यांना त्यांचे 'राखी ज्वेलर्स' या नावाने जीएसटी अकाऊंट काढावयाचे असल्याने, त्यांनी मला अधिकार पत्र दिले असून, मी आमचे ऑफीसच्या मेल आयडीवरून कुमावत यांचे अँप्लीकेशन भरून जीएसटी नंबर मिळविण्यासाठी षासनाच्या संबधीत जीएसटी, जूने कार्यालय, ठाणे यांना पाठविले. दिनांक 24/10/2023 रोजी माझे जीएसटी मंजूरीचे काम असणारे अधिकारी श्री. मधूकर ढोक (जीएसटी) वस्तू व सेवाकर कार्यालय, ठाणे यांचेशी फोनवरून संपर्क झाला असता, त्यांनी सदरचे काम त्यांचेकडेच असून 20,000/- रूपये द्यावे लागतील असे बोलले. त्यावरून लाच मिळाल्याषिवाय संबधीत अधिकारी हे माझे क्लायंट कुमावत यांचे 'राखी ज्वेलर्सचे' जीएसटी रजिस्टेशनचे काम करणार नसल्याचे सांगितले.

माझे क्लायंट कुमावत यांचे 'राखी ज्वेलर्स' या दुकानाचे जीएसटी रजिस्टर करण्यासाठी संबधीत अधिकारी श्री. मधुकर ढोक (जीएसटी)वस्तू व सेवाकर कार्यालय, ठाणे हे माझेकडे लाचेची मागणी करीत आहेत. लोकसेवक ढोके यांनी माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याची माझी अजिबात इच्छा नसल्याने मी त्यांचेविरुद्ध लेखी तक्रार दिलेली आहे.

मी, दिनांक 27/10/2023 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करावयाची असल्याने पो.निरी. श्री.क्षिरसागर, यांनी दोन पंच साक्षीदार बोलावुन घेतले. पंच साक्षीदार हजर झाल्यानंतर पो.निरी.श्री. क्षिरसागर, यांनी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पो.निरी.क्षिरसागर यांनी, मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करावयाची असल्याचे सांगून, पंचासमक्ष सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून पडताळणी कारवाईकामी मला, पंच नं.01 यांचेसह सेल्स् टॅक्स ऑफिसर यांचे कार्यालय, ठाणे येथे लोकसेवक मधुकर ढोक, यांची भेट घेण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन जाण्याचा इशारा केला असता मी व पंच नं. 1 असे आंम्ही दोघेही अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयातून बाहेर पडलो व एका प्रवाशी रिक्षाने चरई या ठिकाणी गेलो. त्यानंतर वस्तू व विक्री कर कार्यालय, ठाणे या कार्यालयाजवळ आल्यानंतर मी, पंच नं.1 यांना हाताने खुणावून रिक्षा बाजूला थांबविणेकामी इशारा केला असता, पंच नं. 1 यांनी रिक्षा चालकास रिक्षा बाजूला थांबविणेस सांगितली त्याप्रमाणे रिक्षा चालकाने कृती केली. त्यानंतर पंच नं.1 यांनी रिक्षा चालकास त्याचे पैसे दिलेनंतर मी व पंच नं.1 असे दोघेही वस्तू व विक्री कर कार्यालय, ठाणे कार्यालयात दुसऱ्या माळ्यावर लोकसेवक श्री. मधूकर ढोक यांच केबिन नं. 206 मध्ये गेलो. सदर वेळी लोकसेवक ढोक हे त्यांचे केबिनमध्ये बसलेले होते. त्यांचेसमोर एका खुर्चीवर एक इसम बसलेले दिसून आल्याने मी त्यांना 'थांबू का सर थोडा वेळ बाहेर' असे विचारले असता, त्यांनी मला 'हो' असे सांगितल्याने, मी त्यांचे केबिनचे बाहेर थांबून राहिलो. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक ढोक यांचे केबिनमध्ये बसलेले इसम बाहेर आले आणि त्यांनी मला एकटयाला हाताने इषारा करुन, लोकसेवक ढोक यांचे केबिनमध्ये जाणेस सांगितल्याने, मी पंच नं. 1 यांना ढोक साहेबांचे केबिनबाहेर थांबून राहणेंस इशारा केला आणि मी ढोक साहेबांच्या केबिनमध्ये गेलो.

त्यानंतर मी ढोक साहेबांना माझे प्रलंबित काम 'राखी ज्वेलर्स'चे जीएसटी रजिस्टेशन,नंबर संदर्भात विचारणा करुन, सदरचे अँप्लीकेशन त्यांचेकडे असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी मला लेटर मारलं.... ऑनलाईन मागवतो... असे सांगितल्यानंतर मी त्यांना पीआरओ नंबर आहे ना.... सिता आणि मोहिनी दोघे पार्टनर आहेत .... असे सांगितले. त्यावर ढोक साहेबांनी मला अगोदर पण तेच प्रोप्रायटर होते का.... असे विचारुन, 100 रुपयामध्ये

पार्टनरशिप डिड होतयं का?...500 रुपयाचे लागतसं त्याला असे मला सांगितले. त्यायनंतर मी ढोक साहेबांना ''काय प्रॉब्लेम नाही ना त्याचा....जुना वाला जीएसटी बंद करायचा आहे.... आणि हा चालु करायचा आहे'' असे विचारले असता, ढोक साहेबांनी माझे क्लाईटचे दुकानाचे नंबर विषयी बोलणी केली आणि त्यामध्ये मोहिनीदेवींचे आधार व्हेरिफिकेशन तसेच पीटीईसी सर्टिफिकेट पेंडींग असल्याचे कारण मला सांगितले. त्यावर मी ढोक साहेबांना आता पाठवता का ओटीपी, मी करतो आताच असे सांगितले. तेव्हा ढोक साहेबांनी मला बरं उद्याला येईल ते... आज येत नाही असं ऑथोराईज पर्सन पाहिजे ना.... माझ काय पाहु नको का? त्रूटी नाही काढल्या तर....प्रोफेशनल टॅक्स एवढंच काम आहे.. पीटीसी चा नंबर..... पाच हजार रुपये भरावे लागतील..... दोघा जणांचे......असे सांगितले. तेव्हा मी त्यांना अॅग्रीमेंट रजिस्टर आहे, पीटीसी काढतो पाहीजे तर...काय प्रॉब्लेम नाही.... पीटीसी निघेल.... बाकी सगळं लाईट बील दिलयं.... असे सांगितले.

त्यानंतर ढोक साहेबांनी मला, सांगितल्याप्रमाणे काम करतो का ते सांग....चलं असे विचारले असता, मी त्यांना बोला ना आता कसं काय असे विचारले. तेव्हा त्यांनी मला तुला तर मागच सांगितलंय ना ... तुला मागेच सांगितलं ना.... असे सांगितले. तेव्हा त्यांनी मी सांगितले की, ते काम राकेश ज्वेलर्सच होतं, त्याच काय रिजेक्ट केलं आहे का? आता हयाचं काय करायचं ते सांगा ते तुम्ही.... असे विचारले. तवर ढोक साहेब मला '' तुला किती सांगितले होते मी मागे.... वीस सांगितले होते..... असे म्हणाले.'' तेव्हा मी त्यांना मागचं आता किती दिवस ते मला आठवत पण नाही.... सर 20 हजार नाही, क्लायंट एवढे देणारचं नाही असे सांगितले. त्यानंतर ढोक साहेबांनी मला 10 असे सांगितले असता, मी त्यांना सर मला क्लायंट जपायचे आहेत, माझ्याकडंन सगळ व्यवस्थित आहे ना, असे सांगितले असता त्यांनी मला ''मी काढू का शोकास?.... सगळं.... शोकास काढु का सांग.... शोकास काढतो मग.... असे सांगितल्याने, मी त्यांना सर हे पैसे मलाचं तुम्हाला द्यायचे आहेत, क्लाईंटला नाही, कमी करा अजून थोडे असे सांगितले असता, ते मला 7 घेवून ये जा, सात घेवून ये, असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना '' सात हजार फायनल सर, असे विचारले तेव्हा ते ''हा'' म्हणाले व मी त्यांना साहेबांषी बोलून सांगतो तुम्हाला... फोन करतो मी, आहात ना तुम्ही '' असे सांगितले. तेव्हा त्यांनी '' हो.....तु तेवढं कर हे...त्याचं अॅप्लीकेशन काढून घेतो.... असे सांगितले. त्यानंतर मी ढोक साहेबांना आधार ओटीपीचं करुन घेतो, पेपर बरोबर आहेत ना असे विचारल असता, ते मला ''अरे पेपर असते तर तसेच दिलं असतं तुला....हे इश्यु आहे म्हणूनचं दिलं नाही ना...'' असे सांगितले. तेव्हा मी त्यांना ''करतो मी.....पीटीसी पण अपलोड करतो आणि हे पण करतो.....उद्या नसणार ना तुम्ही, शनिवार आहे ना? असे विचारले असता, त्यांनी मला ऑफिस उदया व परवा चालु आहे, उद्या 10 वाजता मी येईल सकाळी, असे सांगितले, तेव्हा मी आधारचं काय ओटीपीचं आहे ना...करुन घेतो ना मी....सात हजार रक्कम साहेबांना सांगून..... करतो मी काहीतरी.....असे म्हणालो असता, ढोक साहेबांनी मला म्हणाले '' तेवढं सांग....ते होतचं नाही म्हणुन सांग....असे सांगितले तेव्हा मी त्यांना साहेब गरज आहे, चला येवू का असे सांगून, त्यांचे केबिनमधून बाहेर येवून तळमजल्यावर आलो. सदर वेळी पंच नं. 1 हे देखील माझे पाठोपाठ कोणास संशय येणार नाही अशा रितीने माझे आजुबाजूरा उभे राहिले त्यानंतर आम्ही दोघेही सदर कार्यालयाचे बाहेर रस्त्यावर आलो. त्यानंतर पंच नं. 1 यांनी एक रिक्षा थांबवून, आम्ही दोघेही रिक्षाने अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो.'' सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा कार्यालयात करण्यात आलेला आहे.

मी, दिलेल्या लाचेच्या मागणीच्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक मधूकर ढोक, यांनी माझे क्लायंटचे दुकानाचे जीएसटी रजिस्टर करण्यासाठी त्यांचेकडून 20,000/-रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून, तडजोडीअंती 7,000/- रूपये स्विकारण्याचे कबुल करून, सदर लाचेची रक्कम घेवून मला दिनांक 28/10/2023 रोजी सकाळी 10.00 वा. कार्यालयात बोलविले असल्याचे, केलेल्या पडताळणीअंती निष्पन्न झाले.

''दि. 28/10/2023 रोजी मला एका अंत्यत महत्वाचे खाजगी कामानिमित्त बाहेर जाणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच लोकसेवक ढोक यांनी तक्रारदार यांना उदया, परवा कधीही ये असे सांगितल्याने, आपण सदरची सापळा कारवाई दि. 30/10/2023 रोजी आयोजित करावी'' अशी विनंती केली असता, पो.निरी क्षिरसागर यांनी दोन्ही पंचांशी विचारविनिमय करुन, सदरची सापळा कारवाई माझे विनंतीवरून दि. 30/10/2023 रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगून, नमूद दिवशी संपुर्ण सापळा पथक, मला व दोन्ही पंचांना अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे कार्यालयात सकाळी 09.00 वा. हजर राहण्याच्या सूचना दिल्या.

मी, दिनांक 30/10/2023 रोजी सकाळी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे पो.निरी.क्षिरसागर यांचे केबीनमध्ये हजर झालो. आज रोजी लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालयामध्ये भ्रष्टाचार निमूर्लन निमीत्त दक्षता जनजाग्रती सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन असल्याने सर्व पथक कार्यक्रमात व्यस्त होते त्यानंतर दूपारी 01.30 ते 02.30 पर्यंत लोकसेवक यांचे कार्यालयास जेवणाची सूटटी असल्याने सापळा कारवाई दुपारी 02.30 नंतर चालू करण्याचे पो.नि.

क्षिरसागर यांनी सांगितले.

त्यावेळी पो.निरी. श्री. क्षिरसागर, यांनी मला दोन्ही पंचासमक्ष लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितली. त्यावेळी मी, माझेकडे घर खर्चासाठी असणारे रक्कमेतील 7,000/-रूपये दोन्ही पंचासमक्ष पो.निरी. श्री. क्षिरसागर, यांचेकडे दिली. त्यानंतर त्यांनी मी, हजर केलेले सर्व नोटांचे नंबर नोंद करून, सदर लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावून, ती माझे पॅन्टचे उजवे बाजुचे खिशात ठेवून दिली. त्यानंतर सदर सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात रितसर पुर्ण करण्यात आली आहे. त्याबाबत सविस्तर सापळापुर्व पंचमाना करण्यात आलेला आहे.

सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर पो.निरी. क्षिरसागर यांनी, सापळा पंचनामा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून, पंच नं. 1 यांचेसह लोकसेवक मधुकर ढोक, याची भेट घेणेकामी जाणेबाबत इशारा केला असता मी व पंच नं. 1 असे आंम्ही दोघेही अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयातून बाहेर पडलो व एका प्रवाशी रिक्षाने चरई या ठिकाणी गेलो. त्यानंतर वस्तू व विक्री कर कार्यालय, ठाणे या कार्यालयाजवळ आल्यानंतर मी, पंच नं. 1 यांना हाताने खुणावून रिक्षा बाजूला थांबविणेकामी इषारा केला असता, पंच नं. 1 यांनी रिक्षा चालकास रिक्षा बाजूला थांबविणेंस सांगितली त्याप्रमाणे रिक्षा चालकाने कृती केली. त्यानंतर पंच नं. 1 यांनी रिक्षा चालकास त्याचे पैसे दिलेनंतर मी व पंच नं. 1 असे दोघेही वस्तू व विक्री कर कार्यालय, ठाणे कार्यालयात दुसऱ्या माळयावर लोकसेवक श्री. मधूकर ढोक यांचे केबिन नं. 206 मध्ये गेलो. सदर ठिकाणी श्री. ढोक हे दिसले नाही म्हणुन मी, श्री.ढोक यांचे मोबाईल फोनवर फोन केला असता श्री. ढोक हे चहा पिण्यासाठी गेले असल्याचे त्यांनी सांगुन बाहेर बसण्यास सांगीतले. म्हणुन मी कार्यालयाचे बाहेर खुर्चीवर जावुन बसलो. काही वेळात श्री. ढोक हे कार्यालयात आले त्यांचे पाठोपाठ मी व पंच नं. 1 असे कॅबीनमधे गेलो त्यानंतर मी, पंच नं. 1 हे माझे मित्र असल्याचे श्री. ढोक यांना सांगुन यांचे सुध्दा काम असल्याचे सांगीतले. श्री. ढोक यांनी

पंच नं. 1 यांना आपले काम कलेक्टर कंम्पाउंड मधील कार्यालयात आहे. असे सांगुन '...तुम्ही या...आं...सरळ रिक्षा घे, येथुन तुम्ही या पटकन पकडा' असे सांगीतल्याने पंच नं. 1 हे कॅबीनमधुन बाहेर गेले. त्यांनतर श्री. ढोक हे मला 'रिक्वेस्ट टाकलीस का....तु....राखी ज्वेलर्सची रिक्वेस्ट तु टाकलीस का.' असे म्हणाले असता मी त्यांना 'टाकली टाकली....रिप्लाय पण केला असेल... तुम्ही टाकला असेल तर..'असे म्हणालो त्यावर श्री. ढोक हे 'कुठयं नाही केलं..तरी सांगीतलं तुला शोकास काढतो तुला....तु घाई करू नकोस..' असे बोलुन हाताचे बोटानी इशारा करून लाचेची रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना 'बर ऐका तुम्ही... म्हटल्याप्रमाणे सात हजार रूपये घेवुन आलो आहे .... आजच्या आज करून दया तुम्ही..,तुम्ही शोकास काढलयं ना..,मी नोटीस चा रिप्लाय करतो..... आजच्या आजच करतो मी..असे म्हणालो त्यावर श्री. ढोक हे मला 'आजच्या आज आलं पाहीजे ते माझेकडे.... आज झालं तरच होईल ते..'असे म्हणाले त्यावर मी त्यांना 'मी स्टाफला सांगतो लगेच एस सी एन चा रिप्लाय दयायला... लगेच सांगतो....तुम्हाला एका तासात लगेच रिप्लेक्ट होवुन जाईल.....मी आता चर्चगेटला होतो तिकडुन आलो या कामासाठी....बोलवलं तुम्ही म्हणुन' असे म्हणालो असता त्यानी माझे समोर डायरी ठेवुन लाचेची रक्कम ठेवणेबाबत इशारा केला व 'ठेवुन ठेव यामध्ये' असे म्हणाले त्यावर मी 'हा...एकदम....डायरीत ना...' असे बोलुन लोकसेवक यांचे डायरीत लाचेची रक्कम ठेवुन दिली. त्यावर श्री. ढोक यांनी 'दरवाजा बंद कर..'असे म्हणाले त्यांनतर 'मी स्वतःहुन फोन केला असता ना समोरून तुला, 'मी...सकाळी आल्यावर मी पाहीलं ते....चेक करून घेतो ना मी आल्यावर....असे म्हणाल्यावर मी त्यांना 'तुम्ही....फोन केला असता म्हणतायं का...आणि तुम्ही फोन करून काय त्यांनी पैसे तर देणार तुम्हाला....मीच देणार नां..,तुम्ही मला फोन केला असता...त्यांने नसत दिलं.... तुम्ही ते म्हणल्याप्रमाणे ते सगळं घेवुन आलो...डायरीत ठेवलेत साहेब आणि संध्याकाळ पर्यंत करा'...असे म्हणालो असता 'करून देतो.....चल....आण..' ( त्यावेळी लोकसेवक डायरीतील लाचेची रक्कम शर्टाचे डावे खिशात

ठेवतात ) व 'निश्चींत रहा' असे म्हणाले.

एकंदरीत लोकसेवक मधुकर ढोक, यांनी माझ्याकडे पैशाची मागणी केली असता, मी माझे पॅन्टचे खिशात ठेवलेली लाचेची रक्कम बाहेर काढून, त्यांचे समोर धरली असता, लोकसेवक मधुकर ढोक, यांनी मला लाचेची रक्कम त्यांचे टेबलवर असलेल्या डायरीचे आत ठेवण्यास सांगीतली म्हणुन मी, लाचेची रक्कम 7000/-रू. डायरीचे आत ठेवुन दिली. त्यांनतर त्यांनी सदर लाचेची रक्कम डायरीतुन काढुन आपले शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवुन दिली. त्यांनतर मी, कॅबीनचे बाहेर येवुन लाचेच्या रक्कमेचा स्विकार झाल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पो.निरी. क्षिरसागर व सापळा पथकाने, लोकसेवक श्री. ढोक यांना 16.20 वाजता रंगेहाथ पकडले आहे. त्याबाबत सविस्तर सापळा पंचनामा कार्यालयात करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक मधुकर सोमाजी ढोक, वय-57 वर्ष, राज्य कर अधिकारी, महाराष्ट्र शासन, वस्तु व सेवा कर विभाग, ठाणे राह. 303 वैभव संकुल, विजय नगर, आमराई रोड, कल्याण, पुर्व यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन, माझे क्लायंट 'राखी ज्वेलर्स' चे प्रोप्रायटर, कुमावत यांना त्यांचे 'राखी ज्वेलर्स' या नावाने जीएसटी अकाऊंट काढुन देण्याकरीता दिनांक 27/10/2023 रोजी 20,000/-रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 7000/- रूपये लाचेची मागणी करून, स्विकारण्याचे कबूल केले. त्यानंतर दिनांक 30/10/2023 रोजी माझेकडुन, 7,000/-रूपये लाचेची रक्कम स्विकारून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी, अँथ्रासीन पावडर लागलेली लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन, त्यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

ravindra vasantrao kshirsagar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Deepak

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ravindra vasantrao k

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

Bakade HC 1179
पोलीस ठाणे अंमलदार
नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे.
दिनांक:- 31/10/2023

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**